महा.-४४६/२०१०एफ११२६३
स्थापना : २०११
संस्थेचे बँक खाते क्र. : 42247766630
Ifsc : SBIN0020043
संत नामदेव महाराज
शेलगाव(जं.)
श्री संत नामदेव महाराज
(चिं.मा)बउद्देशीय सामाजिक संस्था शेलगाव (जं.)
ता.- कळंब जि.- धाराशिव
* संस्थेचे मुख्य कार्य *
१) सर्व समाजामध्ये वाढलेली व्यसनाधीनता कमी करणे.
२) सर्व समाजामधील गरीब कुटुंबातील शाळकरी मुलामुलींना शालेय साहित्य व कपडे वाटप करणे. ३) गोशाळा चालवणे. (सदरील संस्था ही 80G, व 12Ap नुसार असून, सदर संस्थेत मदत करून, सामाजिक कार्यास सढळ हाताने मदत करून सहकार्य करावे, ही नम्र विनंती.)
कार्यालय पत्ता : बाबा नगर, तवले निवास, कळंब, ता. कळंब जि. धाराशिव
अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२२१४९९९८,९७६३२५३२८०,९६६५२१२५९२

दैनिक
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
अचूक वेध, अचूक बातमी
newsaksharaj2021@gmail.com
संपादक : विनोद कैलास गोरे

फ्रेंचाईजी देणे आहे
AGRIBLE GLOBAL TRADE PRIVATE LIMITED
Shree Masala
गुंतवणूक २.५ लाख फक्त
आमच्या नामांकीत कंपनीची
संपुर्ण महाराष्ट्रात डिस्ट्रीब्यूटरशिप देणे आहे
--- आमची वैशिष्ट्ये ---
५ दिवसात व्यवसाय सुरू
कमी भांडवल जास्त नफा
स्वस्त आणि मस्त प्रोडक्ट
कुणीही हा व्यवसाय करु शकते
सहज, सरळ व सोपा व्यवसाय
तुम्हाला काहीही बनवायचे नाही
ग्राहकांची वाढती मागणी
आमच्या मसाला प्रोडक्ट ची शाखा घ्या व भरपुर प्रॉफीट मिळवा...
संपर्क : ८०८०४९१८६९

• वर्ष ३ रे • अंक २५४ वा • पाने ४
बुलडाणा, बुधवार, दि.२४ एप्रिल २०२४
• RNI NO. : MAHMAR/2022/82056 • किंमत : ३ रुपये

# अमरावतीमधील अमित शाहांच्या सभेवरून राडा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, अमरावती :** अमरावती लोकसभा मतदारसंघात उमेदवारी जाहीर होत असताना बच्चू कडू आणि महायुतीमधील संघर्ष विकोपाला गेला. भाजपाने नवनीत राणा यांना पक्षात घेऊन उमेदवारी दिल्यामुळे नाराज झालेल्या बच्चू कडू यांनीही प्रहार जनशक्तीतर्फे दिनेश बुब यांना मैदानात उतरविले.

तर महाविकास आघाडीतर्फे बळवंत वानखेडे यांना उमेदवारी देण्यात आलेली आहे. भाजपाने अमरावतीमध्ये विजय मिळवण्यासाठी कंबर कसली असून अनेक दिग्गज नेत्यांच्या सभा येथे झालेल्या आहेत. आता मतदानाच्या अवघ्या दोन दिवस आधी म्हणजेच २४ एप्रिल रोजी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचीही सभा होणार आहे. त्यावरून बच्चू कडू आणि रवी राणा आमनेसामने आलेले पाहायला मिळत आहे. अमरावती शहरातील सायन्स कोर मैदानात प्रहार जनशक्ती पक्षाच्या बच्चू कडू यांना २३ आणि २४ एप्रिलसाठी सभा घेण्यास निवडणूक आयोगाकडून परवानगी



मिळाली होती. मात्र २४ एप्रिल रोजी भाजपाच्या उमेदवार नवनीत राणा यांच्या प्रचारासाठी अमित शाह याच मैदानावर प्रचार सभा घेणार असल्यामुळे बच्चू कडू यांना आज मैदानाचा ताबा घेण्यासापासून पोलिसांनी मज्जाव केला. आपल्याकडे रितसर परवानगी असूनही पोलीस आपली अडवणूक करत असल्याचा आरोप करून बच्चू कडू यांनी पोलिसांसमोर ठिय्या आंदोलन करत पोलीस भाजपाधार्जिण निर्णय घेत असल्याचा आरोप केला. बच्चू कडू यांच्या आक्रमक भूमिकेनंतर स्वाभिमानी युवा पक्षाचे नेते आणि नवनीत राणा यांचे पती रवी राणा यांनी टीका केली आहे.

**काय म्हणाले रवी राणा?**

टीव्ही ९ या वृत्तवाहिनीशी बोलत असताना रवी राणा म्हणाले, बच्चू कडू हे नेहमीप्रमाणे स्वस्तातली प्रसिद्धी मिळवण्यासाठी नौटंकी करत आहेत. या नौटंकीबाजाला महाराष्ट्राची जनता चांगली ओळखून आहे. देशाचे गृहमंत्री अमित शाह हे अमरावतीमध्ये येत आहेत.

अमित शाह यांनी अमरावतीमधील उमेश कोल्हे हत्याकांड उघड करण्यासाठी प्रयत्न केले होते. तर दुसऱ्या बाजूला तत्कालीन मंत्री बच्चू कडू आणि यशोमती ठाकूर यांनी हे हत्याकांड दाबण्याचा प्रयत्न केला होता. उमेश कोल्हे यांच्या प्रकरणाला घरोफोडीच्या प्रकरणात बदलण्यात आले होते. मात्र अमित शाह यांच्या हस्तक्षेपामुळे या प्रकरणात न्याय मिळाला. त्या अमित शाह यांना बच्चू कडू विरोध करत आहेत, हे दुर्दैवी आहे.

महत्त्वाच्या नेत्यांच्या सभा होत असतील तर निवडणूक आयोगाकडून त्या त्या वेळी निर्णय घेतले जात असतात. उद्या अचलपूर येथे आमची सभा होती. मात्र तिथे राहुल गांधी येणार असल्यामुळे माझी सभा रद्द करण्यात आली. काल सांस्कृतिक भवन आमच्या नावाने घेण्यात आले होते.

मात्र शरद पवार आणि उद्धव ठाकरे येणार असल्यामुळे ऐनवेळी आम्हाला दिलेली परवानगी रद्द करण्यात आली.मोठे नेते येणार असतील तर त्यांच्या सुरक्षेच्या कारणास्तव काही बदल केले जात असतात. प्रशासन त्याचा निर्णय घेत असते. बच्चू कडू यांनी परवानगी मागण्याआधीच आम्ही २१ ते २४ एप्रिल या तारखांमध्ये आमची सभा होऊ शकते, असे निवडणूक आयोगाला कळविले असल्याचे आमदार रवी राणा म्हणाले.



**अक्षराज : आकाश जयस्वाल**

**दि.२३, माहूर (नांदेड) :**

महाराष्ट्रातील साडे तीन शक्तिपीठापैकी एक माहूर गडावरील रेणुका आईच आजच सुंदर छायाचित्र.

**आईचे आजचे दर्शन माहुर गड जय जगदंब**

## थोडक्यात

### हातकणंगलेत प्रचारात सत्यजित पाटील आघाडीवर



**अक्षराज : राहुल शिंदे**


**दि.२३, हातकणंगले :** हातकणंगले मतदारसंघात शिंदे सेनेचे खासदार धैर्यशील माने, ठाकरे गटाचे, सत्यजित पाटील, वंचित बहुजन चे डीसी पाटील ,स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी अशी चौरंगी लढत होत आहे.पण सध्यातरी प्रचारात आघाडीवर सत्यजित पाटील दिसत आहेत.माजी आमदार सुजित मिणचेकर हे हातकणंगले तालुक्यामध्ये सत्यजित पाटील यांच्या प्रचारासाठी हातकणंगले तालुका पिंजून काढताना दिसत आहेत.

तर दुसऱ्या बाजूने वडगाव मध्ये उद्धव बाळा साहेब ठाकरे गट शिवसेना शहरप्रमुख संदीप पाटील, अंकुश माने, सुनील माने, काँग्रेसचे सचिन चव्हाण, राष्ट्रवादी शरद पवार गट प्रीतम मुधाळे, अशी फलटण प्रचार करताना दिसत आहेत. तर दुसऱ्या बाजूला खासदार धैर्यशील माने दोन नंबरला असल्याचे जाणवते. चारही उमेदवार मेळाव्यातून उमेदवाराच्या विजयाची खात्री व्यक्त केली जात आहे. एकूण चुरस पाहता मताधिक्याचा किती मोठा आकडा असणार याची चर्चा जनतेतून होत आहे. धैर्यशील माने यांच्या पोस्टर मधून जनसुराज्याचे सर्वेसर्वा विनायक कोरे यांचा फोटो गायब असल्याची चर्चा जनतेतून होत आहे. चौरंगी लढती मध्ये बाजी कोण मारणार या कडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे. संघटनेचे नेते राजू शेट्टी यांना पुन्हा चिन्ह म्हणून शिट्टी मिळालेली आहे.

### काय फुटपाथ गेले चोरीला? हे खर आहे का?

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२४, कल्याण :** कल्याण शहरातील अनेक रस्ते अतिक्रमणाखाली आहेत. एकही मुख्य रस्ता किंवा बाजारपेठ नाही जिथे अतिक्रमण नाही. दुकानदारांनी आपला माल दुकानासमोर १० ते १५ फूट ठेवला आहे. बाजारपेठेत अतिक्रमण झाले आहे. फूटपाथवरही अतिक्रमण झाले आहे. फूटपाथ असूनही लोकांना रस्त्यावरून चालावे लागत आहे. त्यामुळे अपघाताचा धोका कायम आहे. कल्याण पूर्वेतील दुकानदारांनी चक्क माल बाहेर ठेवून अतिक्रमण केले आहे, मात्र महानगर पालिका प्रशासन डोळे बंद करून बसले आहे. पाहणे आणि फक्त पाहणे. अतिक्रमणामुळे कोळसेवाडी परिसरात दिवसभर चक्का जाम असतो. नगरपालिकेने गेल्या वर्षभरात दाखवण्यापूर्ती शहरातील अतिक्रमणे हटविण्याची मोहीम राबविली. पण आशाने दुकानदारांचे



मनोबल उंचावले असून शहरात अतिक्रमणाचे जाळे पसरत चाले आहे. काही दिवसापूर्वी आयुक्त मॅडम इंदुरनी जाखड यांच्या आदेशाने कारवाई झाली पण ती या परिसरात नाही. जाहिरात बेकायदा पार्किंग हीही मोठी समस्या आहे शहरात प्रशासनाने पायी चालण्यासाठी फूटपाथ बनवले असले तरी या फूटपाथवरून लोक चालत नाहीत तर दुकानदारांचे सामान तिथेच ठेवले जाते. काही मार्गांवर लोक आपली वाहने पार्क करून खरेदीसाठी जातात, त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या वाढते.

## मुळशीतील मुठा गावात थरार ; पोलिसांवर गोळीबार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, पुणे :** दरोड्याच्या प्रयत्नाच्या गुन्हयात फरार असलेल्या गुन्हेगाराचा पाठलाग करताना गुन्हेगाराने पोलीस पथकावर पिस्तूलातून गोळी झाडल्याने प्रत्युत्तर म्हणून पोलिसांनी गुन्हेगारावर तीन गोळ्या झाडल्या. यानंतर त्याच्या दुचकीला गाडी आडवी घालून त्याला साथीदारासह जेरबंद केले. मुळशी तालुक्यातील मुठा गावजवळ मंगळवारी दुपारी ही थरारक घटना घडली.

नवनाथ निलेश वाडकर(वय १८ रा.जनता वसाहत, पर्वती) आणि केतन साळुंखे अशी अटक करण्यात आलेल्या गुन्हेगाराची नावे आहेत. केतन साळुंखे हा स्वारगेट पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या पत्रकारावरील हल्यातील आरोपी आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार नवनाथ वाडकर सराईत गुन्हेगार आहे. तो सिंहगड पोलीस ठाण्याच्या हद्दीत दरोडा टाकण्याच्या तयारीत असल्याची खबर पोलिसांनी मिळाली होती. तेव्हा पोलिसांना हुलकावणी देत नवनाथने पळ काढला होता. याप्रकरणी सिंहगड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. तेव्हापासून खंडणी विरोधी पथक त्याच्या मागावर होते. तो मुठा परिसरात पिस्तूल घेऊन आला असल्याची खबर खंडणी विरोधी पथकाला मिळाली होती. वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रताप मानकर यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीकांत चव्हाण यांचे पथक दोन मोटारींतून त्याच्या मागावर गेले. एनडीए रस्ता येथे तो दुचाकीवरुन साथीदारासह जाताना दिसला. पोलिसांनी त्याचा पाठलाग सुरु केल्यावर त्याने पोलिसांवर पिस्तूलातून गोळी झाडली. मात्र, सुदैवाने ती कोणाला लागली नाही. प्रत्युत्तरादाखल पोलिसांनी त्याच्यावर तीन गोळ्या झाडल्या. यानंतर गाडी त्याच्या दुचाकीला आडवी घालून दोघांनाही ताब्यात घेतले.

**जनता वसाहतीत वाडकर टोळीची दहशत**

पर्वतीमध्ये निलेश वाडकर आणि चॉकलेट सुन्या अशा दोन टोळ्या आहेत. वर्चस्ववादातून दोन्ही टोळ्यांमध्ये अनेकदा खटके उडाले आहेत. चॉकलेट सुन्याच्या टोळीने २०१८ मध्ये निलेश वाडकर याचा पर्वती पायथा येथे खून केला. त्यामध्ये चॉकलेट सुन्यासह २२ जणांना अटक करण्यात आली. चॉकलेट सुन्या आणि साथीदारांविरुद्ध मोका कारवाई करण्यात आली. निलेश वाडकरचा मुलगा नवनाथ हा अल्पवयीन होता. वडिलांच्या खुनाचा बदला घेण्याची शपथ त्याने घेतली. वाडकर टोळीने चॉकलेट सुन्याच्या भावाचा खून केला. नवनाथने अल्पवयीन असतानाच दोन जणांच्या खुनाचा प्रयत्न केला. नवनाथवर अल्पवयीन असताना आठ गुन्हे दाखल झाले आहेत.

## विकसित नांदेडसाठी भाजपला मताधिक्य द्या - खा.अशोकराव चव्हाण

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२३, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यातील बारड येथील महायुतीच्या प्रचारसभेत बोलताना अशोकराव चव्हाण म्हणाले की, आपल्या गावाचा तालुक्याचा विकास करण्यासाठी सत्ता पाहिजे. त्याकरिता प्रतापराव चिखलीकर यांना आपल्या भागातून जास्तीत जास्त मताधिक्याने निवडून द्यावे. बारड येथील जनतेने नेहमीच मला व माझ्या कुटुंबांवर नेहमीच प्रेम केले आहे.

मला बारड मध्ये आल्यावर परिवारात आल्या सारखे वाटते. कै साहेबराव बापू बारडकर कै. शंकरराव बारडकर यांची नेहमीच आठवण झाल्याशिवाय राहत नाही. मी कुठे ही असलो तरी मराठा आरक्षणाच्या प्रश्न नेहमीच उपस्थित करत आलो आहे. जे कांहीं विकासाचे प्रश्न असतील ते मार्गी लावण्यासाठी मी पुढाकार घेणार आहे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा समाजाला १०% आरक्षण दिले आहे. ज्यांच्याकडे कुणबी नोंदी आहेत त्यांना प्रमाणपत्र सुध्दा मिळाले आहेत. बाकीचे सुध्दा अजून काही



प्रश्नासाठी मी सुद्धा आपल्या बरोबर आहे वसंत चव्हाण यांना विचारा मराठा आरक्षण म्हणजे काय आहे हे सांगता येईल का बघा. चव्हाण चव्हाण मध्ये फरक आहे मी दोन वेळेस मुख्यमंत्री झालो आहे ते आता कुठे ग्रामपंचायत च्या बाहेर पडले आहेत. बारड मध्ये लातूर चे हाय फाय मुबंई पुणे मध्ये राहणारे पाहुणे येऊन गेले. २६ नंतर त्यांना एक फोन करून बघा ते घेतील का मी असेल बाळासाहेब असेल जनतेच्या कामासाठी सदैव फोन चालू असतो.

नाना पटोले सारखा बेजबाबदार माणूस मी पाहीला नाही त्यांना कांग्रेस पक्षाचा प्रदेशाध्यक्ष केल्या मुळे कांग्रेसची ही अवस्था झाली त्यांनी विधानसभा अध्यक्ष पदाचा राजीनामा दिला नसता तर मागचे सरकार पडले नसते.

ते अगोदर भाजप मध्ये गेले मोदीने झापल्यानंतर पुन्हा कांग्रेस पक्षात आले पुन्हा सत्ता आले की भाजपमध्येच येणार असा टोला ही लगावला. सभेच्या प्रारंभी बारड चे उपसरपंच बाळासाहेब देशमुख यांनी प्रास्ताविकातुन बारड गावच्या बायपास रोड चा मुद्दा व तेलंगणा, विदर्भ, मराठवाडा आदी परराज्यातील भाविक भक्त शितला देवी च्या दर्शन घेण्यासाठी येतात त्यासाठी

बारड ते बासर शक्तीपीठ मार्गास जोडुन बारड गावच्या विकासात भर टाकावे असे मनोगतात व्यक्त केले.

यावेळी अमरनाथ राजूरकर, श्रीजयाताई चव्हाण, प्रविण गायकवाड, बालाजी गोडसे, गोविंदराव शिंदे नागेलीकर, निलेश देशमुख,हनुमंत देशमुख, जगदीश पाटील भोसिकर, रामचंद्र मुसळे, डॉ माणिक जाधव, सरपंच प्रभाकर आठवले तुळशीराम मुतकलवाड, माधव गाढे या सह बहुसंख्य कार्यकर्ते विशाल जनसमुदाय होता. सभेचे सुत्रसंचालन प्रल्हाद जोंधळे यांनी केले.

# संपादकीय



## क्रिकेटच्या देवाचा वाढदिवस

क्रिकेट हा भारतातील सर्वाधिक लोकप्रिय खेळ आहे म्हणूनच क्रिकेट हा भारताचा धर्म आहे असे मानले जाते आणि खेळात सचिन तेंडुलकर याने जी असामान्य कामगिरी केली आहे त्यामुळे त्याला क्रिकेटचा देव मानले जाते. आज याच क्रिकेटच्या देवाचा म्हणजे सचिन तेंडुलकरचा ५१ वा वाढदिवस आहे. २४ एप्रिल १९७३ रोजी मुंबईत सचिनचा जन्म झाला. त्याचे वडील रमेश तेंडुलकर हे प्राध्यापक होते तसेच मराठीतील प्रसिद्ध साहित्यिक होते तर आई शिक्षिका होत्या. त्या काळातील प्रसिद्ध संगीतकार सचिनदेव बर्मन ह्यांच्या नावावरुन त्याचे सचिन असे नाव ठेवण्यात आले. सचिनने शारदाश्रम विद्यामंदिर या शाळेत रमाकांत आचरेकर यांच्याकडून क्रिकेटचे धडे गिरवायला सुरवात केली. रमाकांत आचरेकर यांनी बालवयातच सचिनची गुणवत्ता हेरुन त्याला प्रशिक्षण दिले. शाळेत असतानाच सचिनने त्याच्या शाळेतील सहकारी मित्र विनोद कांबळी याच्यासोबत हॅरिस शिल्ड स्पर्धेत ६६४ धावांची विक्रमी भागीदारी रचली. सचिनने त्याच्या पहिल्या प्रथम श्रेणी सामन्यातच शतक झळकवण्याचा विक्रम केला. तेंव्हा त्याचे वय १५ वर्ष २३२ दिवस होते आणि त्यावेळी पहिल्या सामन्यात शतकी खेळी करणारा तो सर्वात तरुण खेळाडू होता. सचिन हा असा एकमेव खेळाडू आहे ज्याने रणजी, दुलीप व इराणी चषकाच्या पहिल्या सामन्यात शतक झळकावले. देशांतर्गत क्रिकेटमध्ये अप्रतिम कामगिरी केल्याने वयाच्या १६ व्या वर्षीच सचिनची भारतीय संघात निवड झाली. १९८९ साली त्याने आपला पहिला आंतरराष्ट्रीय सामना पाकिस्तान विरुद्ध कराची येथे खेळला. त्या सामन्यात त्याने इम्रान खान, वसीम आक्रम, वकार युनूस, अब्दुल कादिर या दिग्गज गोलंदाजांचा सामना केला. अर्थात त्याला पहिल्या सामन्यात विशेष काही करता आले नाही. अवघ्या १५ धावांवर तो बाद झाला मात्र पुढच्या सामन्यात त्याने अर्धशतक झळकावुन आपल्या क्षमतेची चुणूक जगाला दाखवून दिली. त्यानंतर तो भारतीय संघासोबत न्यूझीलंड दौऱ्यावर गेला तिथे ८८ धावांची त्याने लाजवाब खेळी केली मात्र त्याला खरी ओळख मिळाली ती १९९१ - ९२ च्या ऑस्ट्रेलियन दौऱ्यात. या दौऱ्यात त्याने पर्थ मधील उसळत्या आणि वेगवान खेळपट्टीवर शतकी खेळी केली. ज्या खेळपट्टीवर जगभरातील दिग्गज फलंदाज तग धरू शकत नाही अशा खेळपट्टीवर सचिनने ऑस्ट्रेलियाच्या दर्जेदार गोलंदाजीसमोर शतक झळकवल्याने हा खेळाडू लंबी रेस का घोडा आहे असे जाणकार म्हणू लागले. त्यानंतर सचिनने मागे वळून पाहिले नाही. जगभरातील सर्वच खेळपट्टीवर त्याने धावा काढायला सुरवात केल्या. १९९६ च्या विश्वचषकात त्याने सर्वाधिक धावा काढून गोल्डन बॅट मिळवली. १९९० च्या दशकात तर सचिनच्या बॅटने अक्षरशः धुमाकूळ घातला. ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, वेस्टइंडिज, पाकिस्तान, श्रीलंका, झिम्बाब्वे अशा सर्वच संघविरुद्ध त्याने खोऱ्याने धावा केल्या. १९९७ साली विसडेनने त्याला त्या वर्षीचा सर्वोत्तम वार्षिक खेळाडू म्हणून घोषित केले. ह्याच वर्षी त्याने पहिल्यांदा कसोटीत १००० धावा केल्या. ह्याची सचिनने १९९९, २००१, २००२ साली पुनरावृत्ती केली. सचिनने वर्षात १००० पेक्षा जास्त धावा करण्याचा विक्रम सलग सहा वेळा केला आहे. असा करणारा तो एकमेव खेळाडू आहे. सचिन तेंडुलकर हा क्रिकेट विश्वात डॉन ब्रॅडमन यांच्यानंतर जागतिक स्तरावर सर्वोत्तम मानला जाणारा क्रिकेटपटू आहे. २००२ मध्ये कारकिर्दीच्या बाराव्या वर्षीच, विसडेनने डॉन ब्रॅडमन यांच्यानंतर सार्वकालिक दुसरा सर्वोत्तम कसोटीपटू व व्हीव्ह रिचर्डस नंतरचा दुसरा सार्वकालिक सर्वोत्कृष्ट एकदिवसीय फलंदाज म्हणून सचिन तेंडुलकरची निवड केली होती. स्वतः डॉन ब्रॅडमन यांनी सचिनच्या फलंदाजीत स्वतःची छबी दिसते असे म्हटले होते. २००३ साली दक्षिण आफ्रिकेत झालेल्या विश्वचषक स्पर्धेत त्याला मालिका विराचा पुरस्कार देण्यात आला मात्र संघाला विश्वचषक जिंकता आला नाही याची त्याला खंत होती. देशाला विश्वचषक जिंकून द्यायचे हे त्याचे स्वप्न होते. हे स्वप्न २०११ साली पूर्ण झाले. सचिनचे दुसरे नाव म्हणजे विक्रम. विक्रमांचे विक्रम करण्याची असाधारण कामगिरी त्याने केली. त्यांचे विक्रम सांगायला गेलो तर पानही पुरणार नाही. आंतरराष्ट्रीय सामन्यात १०० शतक करणारा तो एकमेव खेळाडू आहे. सर्वाधिक धावा, सर्वाधिक सामनावीर, सर्वाधिक मालिकाविर , सर्वात जास्त सामने असे कितीतरी विक्रम त्याच्या नावे आहे. त्याला अनेक पुरस्कार मिळाले आहेत. अर्जुन पुरस्कार, राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार, पद्मविभूषण या पुरस्कारांनी त्याला गौरविण्यात आले आहे. भारतरत्न या देशाचा सर्वोच्च पुरस्काराने देखील त्याला गौरविण्यात आले. भारतरत्न मिळवणारा तो एकमेव खेळाडू आहे. तो राज्यसभेचा खासदारही होता. भारतीय हवाई दलाने त्याला ग्रुप कॅप्टन हा गौरवात्मक हुद्दा प्रदान केला आहे. त्याला अनेक विद्यापीठाची डिलीट ही मानाची पदवी मिळाली आहे. सचिनचा खेळ पाहतच आम्ही लहानाचे मोठे झालो. त्याचा खेळ पाहायला मिळाला हे आमच्या पिढीचे भाग्य. १४० कोटी भारतीयांना आनंद साजरा करण्याची संधी सातत्याने निर्माण करुन देणाऱ्या या क्रिकेटच्या देवाला ५१ व्या वाढदिवसाच्या आभाळभर शुभेच्छा !

# मंदिर परिसरात भेसळयुक्त मिठाई विकण्याचा प्रकार गंभीर !

त्र्यंबकेश्वर मंदिर परिसरात भेसळयुक्त पेढे आणि बर्फी विकणाऱ्या प्रसाद विकेत्यांवर शासनाच्या अन्न आणि औषध विभागाने कारवाई करून भेसळयुक्त मिठाई जप्त केली. सुमारे ५५ हजार किमतीचे पेढे आणि स्पेशल बर्फी जप्त करून ती नष्ट करण्यात आली. मंदिरात दर्शनासाठी जाताना भाविक प्रसाद म्हणून परिसरातील प्रसाद विक्रेत्यांकडून पेढे विकत घेतात. या दुकानांत विकले जाणारे पेढे आणि मिठाई यांमध्ये भेसळ केली जात असल्याच्या तक्रारी अन्न आणि औषध विभागाकडे प्राप्त झाल्या होत्या त्या आधारावर ही कारवाई करण्यात आली. धार्मिक स्थळी प्रसाद म्हणून पेढे, बर्फी, मावा किंवा मिठाई खरेदी करताना ते दुधापासूनच बनवले आहेत ना याबाबत खात्री करण्याचे आवाहन सहआयुक्त संजय नारागुडे यांनी नागरिकांना केले आहे.

दरवर्षी दिवाळी जवळ आली कि मिठाईत भेसळ करून ती चढ्या दारात विकणाऱ्यांचे सर्वत्र पेव फुटते. या काळात सर्वत्र गोडधोडाचे वातावरण असल्याने घसा खवखवणे, खोकला सुरु होणे यांसारखे त्रास जाणवू लागले तरी ते मिठाईमुळे होत आहेत कि घरात बनवलेल्या तेलकट फराळामुळे ते कळत नाही. या काळात प्रशासनाचा अन्न आणि औषध विभागसुद्धा अलर्ट मोडवर असतो. या दिवसांत अनेक मिठाई उत्पादकांवर आणि विक्रेत्यांवर भेसळयुक्त मिठाई विकल्याप्रकरणी कारवाई केली जाते. भेसळयुक्त मिठाई विकण्याचे हेच पेव गेल्या काही वर्षांपासून धार्मिक स्थळांपर्यंत येऊन पोहोचले आहे. त्र्यंबकेश्वर परिसरात भेसळयुक्त मिठाई विक्रेत्यांवर केलेल्या कारवाईची ही पहिली वेळ नव्हे. गेल्या वर्षीही याच परिसरात प्रसाद बनवण्यासाठी आणला गेलेला विना दुधाचा खवा प्रशासनाने ताब्यात घेतला होता. प्रसिद्ध मंदिरांचे उत्सव, यात्रा, नागरिकांचे सुट्टीचे दिवस या काळात मंदिरांना हजारोंच्या संख्येने भाविक भेट देतात. मंदिराच्या सात्विक परिसरातील मिठाई, पेढे प्रसादाच्या रूपाने आपल्या नातेवाईकांना, मित्रमंडळींना आणि शेजारपाजाऱ्यांना वाटण्यासाठी भक्तगण खरेदी करून घरी नेत असतात. या दिवसांत मावा आणि मिठाई यांची मोठ्या प्रमाणात मागणी असल्याने ही संधी साधून काही मिठाई उत्पादक आणि विक्रेते भेसळयुक्त मावा तयार करून त्यापासून तयार केलेले पेढे आणि मिठाई विक्रीसाठी ठेवतात.

कमी खर्चात अधिक उत्पन्न मिळवण्याच्या लोभाने ही भेसळयुक्त मिठाई प्रसाद म्हणून ग्राहकांना विकली जाते. मंदिरात दर्शनासाठी आलेले भाविकही मंदिर परिसरातील चैतन्य सभोवतालच्या मिठाईमध्ये उतरलेले असते या भावाने ती मिठाई विक्रेता सांगेल त्या मूल्यात श्रद्धेने खरेदी करतात. शिर्डीच्या साई मंदिरात प्रतिदिन हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात. या परिसरात विकला जाणारा पेढासुद्धा भेसळयुक्त खव्यापासून तयार केला जात असल्याचे गेल्या वर्षी उघड झाले होते. २०२२ मध्ये आषाढी वारीच्या काळात पेढ्यांमध्ये भेसळ केल्याप्रकरणी पंढरपूर येथील एका व्यापाऱ्याला अटक करून त्याच्याकडील १५० किलो भेसळयुक्त पेढे अन्न आणि औषध विभागाने जप्त केले होते. या मिठाईत स्टार्च मिश्र केल्याचे सिद्ध झाल्यावर ही कारवाई करण्यात आली होती. देवस्थानाला भेट देऊन आलेल्या भाविकांकडे त्याच्या नातेवाईकांकडून, मित्रमंडळींकडून प्रथम मागणी केली जाते ती प्रसादाची. या प्रसादातून आपल्यालाही देवतेचे चैतन्य मिळावे अशी या सर्वांची धारणा असते. भाविकाने आणलेला भेसळयुक्त प्रसाद ग्रहण केल्यामुळे कुणाला शारीरिक त्रास झाला किंवा गंभीर परिणाम जाणवले तर तो प्रसाद खाणाऱ्याचा प्रसाद देणाऱ्यावरील विश्वास तर उडेलच शिवाय ज्या देवतेच्या नावाने प्रसाद ग्रहण केला त्या देवतेवरील त्याची श्रद्धाही उणावू शकते. ही अत्यंत गंभीर बाब आहे



भेसळयुक्त पेढे किंवा मिठाई खाल्यास घशात खवखव होते, खोकला येतो आणि पोटात दुखते. चक्कर येणे, पोटात मळमळणे , उलटी, जुलाब सुरु होणे यांसारखे परिणाम जाणवू लागतात. काविळसारख्या आजाराची लागण होऊ शकते. किडनी आणि यकृतावरही भेसळयुक्त मिठाईचा गंभीर परिणाम होऊ शकतो. इतकेच नाही, तर विषबाधा अधिक झाल्यास खाणाऱ्याचा मृत्यूही ओढावू शकतो. भेसळयुक्त दुधाचे सेवन केल्यास क्षयरोग होऊ शकतो.

कृत्रिम दुधात युरियाची भेसळ असल्यास युरियातील नायट्रोजनमुळे मूत्रपिंड, यकृत आणि हृदय निकामी होऊ शकते. मावा तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे दूध केमिकलयुक्त असल्याचे अन्न आणि औषध प्रशासनाच्या तपासणीत निष्पन्न झाल्यास भारतीय दंड विधान ३२८ कलमान्वये अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्यात येतो. मिठाईसाठी वापरण्यात आलेल्या दुधात पाणी आणि दुधाची पावडर मिश्र केल्याचे आढळल्यास २६२ कलमान्वये गुन्हेगारास आर्थिक दंड ठोठावण्यात येतो. असे असूनही प्रतिवर्षी मिठाईत केल्या जाणाऱ्या भेसळीचे प्रमाण कमी न होता उलट त्यांमध्ये वाढच होत आहे. महाराष्ट्रात गणेशोत्सव काळात मोठ्या प्रमाणात मिठाईची विक्री केली जाते. या दिवसांतही अनेक ठिकाणी भेसळयुक्त मिठाई सर्रासपणे विकली जाते.

आर्थिक लाभासाठी पामतेलाचा वापर करून खवा बनवणे. कृत्रिम आणि केमिकलयुक्त दूध तयार करून त्यापासून मिठाई बनवणे यासारखे प्रकार सणासुदीच्या काळात प्रकर्षाने घडतात. प्रसिद्ध देवस्थानांच्या ठिकाणी भेसळयुक्त मिठाई बनवून ती प्रसाद म्हणून विकणे हा भाविकांच्या श्रद्धेशी आणि जीवाशी खेळण्याचा प्रकार अत्यंत निंदनीय असून अशा गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्यात यावी! देवस्थानांच्या ठिकाणी दर्शनासाठी जाताना भाविकांनी मिठाई नामांकित दुकानातून खरेदी करावी तसेच त्या मिठाईची एक्सपायरी दिनांकही पडताळून घ्यावी !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

# भुरी तांडा येथील बंजारा समाजातील महिलांचा पाण्यासाठी ग्रामपंचायतवर घागर मोर्चा...

**अक्षराज : बालाजी गायकवाड**

**दि.२३, हदगांव (नांदेड) :** हदगांव तालुक्यातील तामासा येतुन ३ किलोमीटर असलेल्या भुरी तांडा या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण आहे त्या गाव मध्ये एकही बोर नाही विहिरी नाही तामसा येथील ग्रामपंचायत सरपंच, ग्रामविकास अधिकारी यांचे दुर्लक्ष असल्यामुळे

, तामसा ग्रामपंचायत च्या अधिनिस्त असलेले वार्ड क्रमांक सहा मधील भुरी तांडा असून येथे गोरगरीब बंजारी समाज मोठ्या प्रमाणात आहेत त्या समाजाला पिण्याच्या पाण्यासाठी वनवन भटकंती वेळ येत असल्याकारणाने अखेर भुरी तांडा येथील बंजारा महिला मंडळांनी घागर मोर्चा करीत घातलेल्या हिंगोली लोकसभा मतदाना बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे तसेच सध्या उणाचा पारा ४१ -४२ अंशावर चढला त्यात लोकसभा निवडणूक प्रचाराची वातावरणही तापले आहे लोकप्रतिनिधी, शासन, प्रशासन, निवडणुकीच्या कामात व्यस्त आहेत अशा परिस्थितीत भुरी तांडा गावात पाणी टंचाई निर्माण झाली असून तेथील नागरिकांना पाणी टंचाईच्या झळा सोसाव्य लागत आहे. म्हणून तामसा येथील ग्रामपंचायत वर घागर मोर्चा काढण्यात आला आहे त्यांनी म्हटले की आम्हाला शासनाकडून योजनेतून बोर पाडून द्यावा अन्यथा आम्ही हिंगोली लोकसभा मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे जोपर्यंत आम्हाला पाण्याची व्यवस्था होत नाही तोपर्यंत घागर मोर्चा मघार घेणार नाही असे बंजारा समाजातील महिलांचे म्हणने आहे यातील उल्लेखनीय बाब म्हणजे मागील१५ वर्षापासून आनंदराव घटलवार पाटील यांनी भुरी तांडा या गावाला पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली होती. परंतु आनंदराव घटलवार हे वार्ड क्रमांक सहा मधून ते आता वार्ड क्रमांक ५ मध्ये आल्या कारणाने भुरी तांडा वासियांना पिण्याच्या पाण्यासाठी इतर वन वन करावी लागत आहे. कारण आनंदराव घटलवार पाटील यांनी या तांड्या वासियांना कधीही वारंवार सोडले नव्हते असे तेथील महिलेचे व नागरिकांचे म्हणणे आहे यांना वर्षापासून भुरी तांडा या गावाकडे अद्यापही कोणत्याही सरपंच ग्रामसेवकांनी लक्ष न दिल्यामुळे पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे विशेष म्हणजे भुरी तांडा येथील नागरिकांनी या तांड्यातून अनेक सरपंचांना ग्रामपंचायत च्या निवडणुकीमध्ये निवडून दिले आहे तरीसुद्धा ते या तांड्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे येथील महिलांचे मनने आहे. तर बुरी तांडा हे वार्ड क्रमांक सहा मध्ये येत असतो मात्र येथील सध्याचे किंवा सरपंच यांनी ता ड्यावर साप दुर्लक्ष केले आहे, म्हणूनच तांड्यावरील महिलांनी व नागरिकांनी पिण्याच्या पाण्यासाठी तामसा ग्रामपंचायत वर घागर मोर्चा काढीत हिंगोली लोकसभा मतदानावर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला आहे.

## उन्हाचा पारा...

चढत राहतो सरारा
तप्त उन्हाचा पारा
गुडूप गायब झाला
रूसून खुतला वारा

उन्हाची शिक्षा सर्वां
भेदभावां कुठे थारा
नतमस्तक सगळेचं
असे दुष्काळ दरारा

जीवव्याकूळ तहाने
अंगातूनि घाम धारा
सांगतोयं धीर धरा
भेगाळलेल्या अधरा

सुटले ना प्राणीमात्र
तेचं नियम जनावरां
कडबा बा तुटपुजा
स्वप्नवत हरित चारा

तग धरल्या रोपांना
खुडे अवकाळीगारा
जगूद्यायचे नाही का
असलाकसला तोरा

हवामान खाते ठप्प
चुकवला सारा होरा
ही तर सुरवात आहे
पुढील मासांत जोरा

- हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

# वाचकांचं पत्र !

## रस्त्यावरील होर्डिंग्सचे स्ट्रक्चरल ऑडिट होते का हे तपासावे

पुण्यात १७ एप्रिलला वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस कोसळल्याने उबाळेनगर बसथांब्याजवळील एक होर्डिंग रस्त्यावर कोसळले. यामध्ये जीवित हानी झाली नसली तरी चार ते पाच चारचाकी वाहनांचे नुकसान झाले आहे. रस्त्यावरच होर्डिंग कोसळल्याने यावेळी प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती. ४ ते ५ किलोमीटर पर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. याच दरम्यान परिसरातील विद्युत प्रवाह खंडित झाल्याने सर्वत्र अंधाराचे साम्राज्य पसरले होते. अर्थात होर्डिंग कोसळल्याची पुण्यातील ही काही पहिली घटना नव्हती. गेल्यावर्षी पिंपरी चिंचवड शहरातील रावेत किवळे परिसरात लोखंडी होर्डिंग कोसळून पाच नागरींकांचा बळी गेला होता. त्यानंतर पुणे महानगरपालिकेने अनधिकृत होर्डिंगच्या विरोधात जोरदार कारवाई केली होती. ज्यामध्ये १२०० हुन अधिक अनधिकृत होर्डिंग्स जमीनदोस्त केल्या होत्या. आता पुन्हा एकदा होर्डिंगमुळे अपघात झाल्याने होर्डिंग्सचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. आजमितीला मुंबई, ठाणे, पुणे, पनवेलसारख्या राज्यातील प्रमुख शहरांमध्ये रस्त्यालगत मोठमोठ्या होर्डिंग्स पाहायला मिळतात.

प्रमुख रस्त्यांवर उभारलेल्या बहुतांश होर्डिंग्स या लोखंडी सांगाडा तयार करून उभ्या केलेल्या असतात. अशा होर्डिंग्स कोसळल्यावर नुकसानही मोठ्या प्रमाणात होते. उन्हाळा आणि पावसाळा या दरम्यान अधूनमधून सोसाट्याचा वारा सुटतो अशा वेळी या होर्डिंग्स पडण्याच्या घडतात. रस्त्यालगत उभारल्या जाणाऱ्या या लोखंडी होर्डिंग्सचे वेळच्या वेळी स्ट्रक्चरल ऑडिट होणे महत्वाचे आहे. शहरांतील या होर्डिंग्सचे स्टक्चरल ऑडिट वेळच्या वेळी होते का ? याकडे पालिका प्रशासन लक्ष देते का हे पाहणेही महत्वाचे आहे. पुण्यात घडलेल्या दुर्घटनेमध्ये कोणतीही जीवित हानी झाली नसली तरी सध्याच्या बदलत्या वातावरणामुळे अवकाळी पाऊस, वादळी वारा यासारख्या स्थिती कुठे आणि केव्हा निर्माण होतील याची काहीच शक्यता वर्तवता येत नाही. त्यामुळे खबरदारीची उपाययोजना म्हणून शहरांतील महापालिकेसह संबंधित विभागाने रस्त्यालगतचे होर्डिंग्स, मोबाईल टॉवर यांचे स्ट्रक्चरल ऑडिट केले गेले आहे का याची या दिवसांत युद्ध पातळीवर पडताळणी करावी.

**- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

## अल्हाददायक सकाळ !

सकाळी उठायचं म्हणजे अगदी जीवावर येतं ,सकाळच्या वेळी काल माझे आजोबा म्हणत होते जरा व्यायाम करावा, प्राणायाम करावा, आपली दिनचर्या कशी एकदम पद्धतीत असायला हवी. काय रे तुम्ही आत्ताची मुलं तुमचं काही धोरण समजतच नाही.कधीही उठा, कधीही बाहेर खायला जा, छे ! असं म्हणून ते आत गेले.त्यांच्या या बोलण्याचा जरा विचार करू म्हटलं आणि उद्या खरंच सकाळी त्यांना उठवून दाखवू असा निश्चय केला. मग काय उठले की सकाळी लवकर काय ते वातावरण म्हणून सांगू आ..हा.हा.... अगदी सुंदर असे पक्षी जणू सकाळी ,सकाळी सकारात्मकतेची गाणी गात आहेत चिव -चिव करत चिमण्यांनी हे शिकवलं की आजचा दाणापाणी मिळवण्यासाठी कष्ट हाच एकमेव पर्याय आहे .बागेतील प्रत्येक पाण्यावर दवाबिंदू रात्री आलेला थकवा जणू सकाळपर्यंत नाहीसा झालेला आहे व आता ते निसर्गातून न्हावून निघाले आहेत असं भासू लागलं. अगदी एखाद्या बिळातील मुंग्यांची रांग देखील सांगत होती आपलं अन्न घरात साठवण्यासाठी छोट्या पासून अगदी मोठ्यांपर्यंत सगळे जीव अगदी जीवाचा आटापिटा करीत होते. ती लगबग ते प्रयत्न सगळं काही अगदी सुखद वाटू लागलं मग ,वर्तमानपत्राद्वारे जगातल्या काण्या कोपऱ्यातली माहिती मिळवत चहाचा आस्वाद घेतला.आ..हा.. तोच ताजा खबर म्हणत वर्तमानपत्राने खूप काही बोलून दाखवलं की आता चला दिवस चालू झालाय कामाला सुरुवात करा. प्रत्येक गोष्टीचा काहीतरी अर्थ लागत होता तोच वारा सुटला अचानक पावसाने हजेरी लावली निसर्गातील सुंदर गोष्टीतील ही एक माझ्या आवडीची गोष्ट म्हणजे पावसाच्या थेंबानी सुटलेला 'मातीचा सुवास' आणि हा सुवास हे असं एकंदरीत वातावरण सकाळी अनुभवलं तर ती सकाळ फारच अल्हाददायक !

**कु. शांभवी जगदीश कुलकर्णी**
**माजलगांव, जि. बीड**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# खोडाळा गावाची भैरवनाथ यात्रा उत्सहात सपंन्न




**सौरभ कामडी**

**खोडाळा (पालघर) :** पालघर जिल्ह्यातील खोडाळा हे गाव एक प्राचीन, सांस्कृतिक चालिरिती रिवाज जपणारे गाव म्हणून ओळखले जाते या गावात मोठ्या प्रमाणात सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. तसेच सर्व धर्मियांचे सन हे उत्सहात साजरे केले जातात. त्याचप्रमाणे गावाचे सांस्कृतिक कार्यक्रम, जत्रा, बोहडा, कुस्ती यांचे ही आयोजन केले जाते. याप्रमाणे खोडाळा गावाचे दैवत काल भैरी, श्री भैरोबा मंदिर खोडाळा याठिकाणी दरवर्षी जत्रेचे आयोजन केले जाते. गावाचे पाटील घराणे येथील कुलदैवत वाजत गाजत श्री भैरोबा, भैरी मंदिर खोडाळा या ठिकाणी घेऊन जाऊन त्यानंतर जत्रा भरली जाते या वेळी भाविक मोठया प्रमाणात दर्शनासाठी येतात व नवस ही दिले जातात निसर्गाच्या सानिध्यात बसलेले हे एक छोटेशे मंदिर आहे व नवसाला पावणारे दैवत म्हणून ओळखले जाते कुलदैवत भगत देवराम पाटील,नामदेव पाटील,व खोडके बाबा हे कुलदैवत घेऊन पालखीत वाजत गाजत मंदिरात जाऊन देवाला निवद देतात. या पालखी सोबत गावकरी मंडळी, पाटील मंडळी ही मोठया प्रमाणत उपस्थिती होती तसेच माजी सरपंच प्रभाकर पाटील, नामदेव पाटील, उपसरपंच उमेश येलमाने, सामाजिक कार्यकर्ते, उमाकांत पाटील,गणेश पाटील,सचिन पाटील, दिनकर पाटील, कृष्णा पाटील, गजानन हमरे, मोहन पाटील, निवृत्ती दोंदे, काशिनाथ दोंदे इत्यादी उपस्थित होते.

# सख्खे बहीण-भाऊ पोलीस उपनिरीक्षक पदी निवड होणे हा योगायोगच : काशिनाथ दाते

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, पारनेर (अ.नगर) :** पारनेर ग्रामीण पतसंस्था परिवाराच्या वतीने राहुल कोरडेंचा सन्मान करण्यात आला यावेळी जिल्हा परिषदेचे बांधकाम व कृषी समिती सभापती काशिनाथ दाते सर बोलत होते.

हिवरे कोरडा माजी चेअरमन कोंडीभाऊ कोरडे, एकनाथ पोटे, मुख्य कार्यकारी अधिकारी सुभाष थोरात, प्रा. संजय आहेर प्रमुख उपस्थिती होते ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील मुलगा ध्येय डोळ्यासमोर ठेवून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेच्या अभ्यासात सातत्य ठेवून यश मिळवले त्याबद्दल राहुलचे कौतुक करावे तेवढे थोडेच. विशेष म्हणजे त्याची बहीण देखील २०१९ च्या झालेल्या स्पर्धा परीक्षेसाठी पोलीस उपनिरीक्षक पदी तिचीही निवड झाली. तिचीच प्रेरणा घेऊन राहुलने यश मिळवले. त्याचे आई-वडील चुलते-चुलती आणि




विशेष म्हणजे आजोबा माझी चेअरमन कोंडीभाऊ कोरडे यांचे विशेष प्रोत्साहन या मुलांना होते याची प्रचिती मला देखील जेव्हा जेव्हा आमची भेट होईल तेव्हा त्यांच्या चर्चेतून जाणवले.

एकाच कुटुंबातील सख्खे बहीण-भाऊ पोलीस उपनिरीक्षक पदी निवड होणे हा सुद्धा एक योगायोगच आहे. दोघांचेही पारनेर ग्रामीण पतसंस्था परिवाराच्या वतीने मनःपूर्वक अभिनंदन व शुभेच्छा. राहुलचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हिवरे कोरडा येथे झाले. पाचवी ते दहावी पर्यंत शिक्षण गोरेश्वर माध्यमिक विद्यालय गोरेगाव येथे झाले. ११ वी १२ वीचे शिक्षण हनुमान विद्यालय टाकळी खातगाव येथे झाले. ११ वी १२ वीच्या दरम्यान स्पर्धा परीक्षेची माहिती मिळाली.

त्यामुळे पदवीचे शिक्षण घेण्यासाठी फर्ग्युसन कॉलेज पुणे येथे ऍडमिशन घेतले. पदवीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरू केला २०१९ च्या परीक्षेत पूर्व मुख्य परीक्षा दिल्या, परंतु मुलाखतीसाठी निवड झाली नाही. त्यानंतर पुन्हा प्रयत्न करून २०२० च्या परीक्षेत पूर्व मुख्य परीक्षा देऊन मुलाखत दिली, परंतु दोन ते तीन मार्क वरून माझा नंबर आला नाही. पुन्हा २०२१ च्या परीक्षेत पूर्व मुख्य पास करून मुलाखतीत माझी निवड झाली आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाली. ग्रामीण भागातील मुलगा जेव्हा शिक्षणासाठी बाहेर जातो, त्यावेळी त्याला सगळ्याच बाजूने अडचणी तयार होतात.

मलाही खूप अडचणीचा सामना करावा लागला. सर्वात मोठी अडचण आर्थिक असते आणि ही अडचण आपल्या विकासाच्या आड येऊ नये, यासाठी आपल्या पालकांनी त्याची जबाबदारी घ्यावी. त्यामुळे आर्थिक अडचणी असल्यावरही आपण उच्च यशापर्यंत जाऊ शकतो. माझीही परिस्थिती हालाखीची होती परंतु घरच्यांनी, नातेवाईकांनी मला खूप मदत केली सर्वांचे खूप खूप आभार मानतो.

# मिरा रोडच्या इस्लामिक सेंटर हॉलमध्ये ईद मिलन कार्यक्रम संपन्न



**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**मीरा रोड :** सदभावना मंच मीरा रोड या संस्थेने मूलभूत अधिकार संघर्ष समिती (मास) व जमाते इस्लामी हिंद या संघटनांच्या सहयोगाने ईद मिलन व सकल मराठा समाज प्रतिष्ठान व खान्देश विकास मंच यांचा सत्कार समारंभ सकाळी ११ वा. मीरा रोड येथे आयोजित केला होता.

प्रमुख वक्ते ऍड इरफान इंजिनिअर व दिनेश राणे ह्यांनी हिंदू मुस्लिम एकता या विषयावर आपले विचार मांडले. डॉ.परवेज मांडवी वाला ह्यांनी रोजे याविषयावर उपयुक्त माहिती दिली.

या प्रसंगी ऍड.इरफान इंजिनियर, दिनेश राणे, डॉ. परवेज मांडवीवाला, मासचे जेष्ठ सदस्य व बँकिंग कर्मचारी नेते राजन नेरुरकर यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साजीद शेख ह्यांनी केले. याप्रसंगी सकल मराठा समाज, खान्देश विकास मंच, लोक सहयोग सेवा भावी संस्था, लिला चॅरिटेबल च्या कार्यकर्त्यांचे मानपत्र व सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाला विभागातील स्थानिक नागरिक,सदभावना मंच मीरा रोड च्या अध्यक्षा अंजुम शेख, साजिदभाई शेख व इतर प्रमुख पदाधिकारी, जमाते इस्लामी मीरा रोडचे अध्यक्ष सैयद बरकत अली व पदाधिकारी, मूलभूत अधिकार संघर्ष समिती (मास) चे उपाध्यक्ष डॉ यु. व्ही. महाडकर, उपाध्यक्षा चित्राताई राणे, मासचे मीरा भाईंदर विभाग प्रतिनिधी घनश्याम आंबोकर, बँकिंग कर्मचारी संघटनेचे नेते व ऑल इंडिया बँकिंग रिटायरीस असोसिएशन चे महासचिव श्री राजन नेरुरकर, लेखक मुख्तार खान यांची प्रमुख उपस्थिती होती.

# हनुमान जन्मोत्सवानिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह

**अक्षराज : आश्रुबा कोठावळे**

**दि.२३, कळंब (धाराशिव) :** हनुमान जन्मोत्सवानिमित्त दिनांक १६ एप्रिल ते २३ एप्रिल या कालावधी आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. मानवाला परमेश्वराने इंद्रिय दिले आहेत. या इंद्रियाला मर्यादेत ठेवलं तर भगवंताचा प्रसाद मिळेल असे विचार प्रसिद्ध कीर्तनकार ज्ञान सिंधू ह.भ .प. संदीपान महाराज शिंदे हसेगांवकर यांनी दक्षिणमुखी हनुमान मंदिर कसबा पेठ कळंब येथे हनुमान जन्मोत्सवानिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात काल्याचे किर्तन सेवा करीत असताना व्यक्त केले. आपल्या कीर्तनसेवे साठी ह.भ.प. ज्ञानसिंधू संदीपान महाराज हासेगांवकर यांनी संत ज्ञानेश्वर महाराजांचा अभंग

परिमळाची धाव भ्रमर वोढी !
तैसी तुझी गोडी लागे मज !!

या अभंगावर निरोपण करीत असताना भुंग्याला परिमळाची ओढ असते. त्याप्रमाणे हे पांडुरंगा मला तुझी ओढ लागो, भ्रमर परिमळाला आकर्षित करून घेतो. तद्वत आपण आपल्या ईश्वर भक्तीने भगवंताला आपल्याकडे आकर्षित करून घेतली पाहिजे. या अभंगावर निरूपण केले.

वैराग्य, ब्रह्म ,प्रेमाच्या प्राप्तीसाठी भगवंत भक्तीची गरज आहे. आपण आपल्या हक्कासाठी संघर्ष केला पाहिजे. सहनशीलता आपल्यात असली पाहिजे. आपल्यात अहंकार येऊ देऊ नका. जगातला भ्रष्टाचार ,अनाचार संपला पाहिजे. तरुण पिढी संस्कारीत झाली पाहिजे. प्रेमाचे दोन प्रकार असून अनुकूल , विरोधी प्रेम, भगवान श्रीकृष्णाला हे दोन्ही प्रेम गोकुळात मिळाले. याप्रसंगी त्यांनी गावरान गाईचे महत्त्व सांगत असताना गाय गोमाता आहे. तिच्या दर्शनात शक्ती आहे. गाय ऑक्सिजन घेते व ऑक्सिजन सोडते. दूध ,शेण

तसेच गोमुत्रामुळे कॅन्सर सारखा दुर्धर आजार बरा होतो. आपल्या दारात एक तरी गाय असावी. त्यांनी याप्रसंगी संत श्रेष्ठ गोरोबाकाका संजीवनी समाधी सोहळ्यानिमित्त तेर येथे वैद्य महावारी ३ मे पासून सुरू आहे. यानिमित्त प्रवचन कीर्तन तसेच एक दिवसाचे संत संमेलन आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमास भक्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन केले. दिनांक २३ एप्रिल रोजी सकाळी ६.१५ वाजता हनुमान जन्मोत्सव उत्साहात संपन्न झाला. यानिमित्त मंदिरावर आकर्षक विद्युत रोशनाई तसेच मंदिर विविध रंगाच्या फुलांनी सजविण्यात आले होते. भावीक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# ...आणि देशांत पंचायत राज सुरू झाले !

भारत देशात पंचायत राज व्यवस्था कार्यरत आहे. त्यामुळे देशातील अंतर्गत कारभार पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून चालवण्यात येतो. त्यासाठी ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद ही सार्वभौम मानली जाते. या पंचायत राज व्यवस्थेतून ग्रामीण भागातील कारभार सुरू करण्यात येतो. त्यामुळे पंचायत राज व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी राष्ट्रीय पंचायत राज दिन २४ एप्रिलला साजरा करण्यात येतो. काय आहे बरं, पंचायत राज दिनाचा इतिहास? लॉर्ड रिपन या इंग्रज अधिकाऱ्याला भारतीय पंचायत राज व्यवस्थेचा जनक मानले जाते. लॉर्ड रिपनने भारतात १२ मे १८८२ला स्थानिक स्वराज्य संस्था सुरू केल्या आहेत. त्यानंतर भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेला पंचायत राज हे नाव दिले. त्यानंतर दि.२४ एप्रिल १९९३ला ७३वी घटना दुरुस्ती करुन पंचायत राज व्यवस्था अधिकृत करण्यात आली. पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी राजस्थानातील नागौर जिल्ह्यातील बगदरी गावात दि.२ ऑक्टोबर १९५९ रोजी पहिल्यांदा पंचायत राज व्यवस्था सुरू केली. त्यानंतर पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी दि.२४ एप्रिल २०१०ला राष्ट्रीय पंचायत राज दिनाची घोषणा केली. तेव्हापासून भारतात २४ एप्रिल हा दिवस राष्ट्रीय पंचायत राज दिन म्हणून साजरा करण्यात येतो. भारतात लॉर्ड रिपनने स्थानिक स्वराज्य संस्था सुरू केल्यानंतर ही व्यवस्था बळकट करण्यात आली. पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी २४ एप्रिल हा दिन राष्ट्रीय पंचायत राज दिन म्हणून जाहीर केला. महाराष्ट्र पंचायत राज व्यवस्था स्विकारणारे ९वे राज्य आहे. पहिल्यांदा राजस्थानने पंचायत राज व्यवस्था स्विकारली आहे. त्यानंतर आंध्रप्रदेशाने १ नोव्हेंबर १९५९ला पंचायत राज व्यवस्था स्विकारली आहे. तर महाराष्ट्राने पंचायत राज व्यवस्था लागू करण्यासाठी वसंतराव नाईक समिती १९६०ला नेमली होती. या समितीने आपला अहवाल १५ मार्च १९६१ला शासनाला सादर केला होता. दि.१ एप्रिल १९६१ला सरकारने हा अहवाल स्विकारला होता. मात्र त्याची अंमलबजावणी झाली नव्हती. त्यानंतर दि.१ मे १९६२ला सरकारने महाराष्ट्र राज्यात पंचायत राज व्यवस्था लागू केली. त्यानुसार वसंतराव नाईक समितीच्या शिफारसीवरुन महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम १९६१ तयार करण्यात आला.

पंचायत राज व्यवस्थेच्या मुळाचा शोध घ्यावयाचा झाल्यास भारतात अगदी प्राचीन काळापासून पंचायती अस्तित्वात असल्याचे दिसते. अर्थात आजच्या पंचायत राज पद्धतीपेक्षा त्याचे स्वरूप खूपच वेगळे होते. गावातील हुशार, अनुभवी, आदरणीय अशी पंचमंडळी असायची. गावातील चावडी सारख्या सार्वजनिक ठिकाणी रोज सकाळी ही मंडळी बसायची आणि गावातील लोकांच्या अडचणी समजावून घेऊन मार्गदर्शन करावयाची. गावामध्ये काही वाद, भांडणे झाल्यास त्यामध्ये लक्ष घालून सोडविणे, गावचा विकास होण्यासाठी योजना आखणे, गावाचा कारभार चालविणे, गावाचा कर गोळा करून राजाला खंड वसूली देणे इ.कामे ही पंचमंडळी पार पाडीत असत. गावात त्यांना फार मान होता. गावकरी त्यांच्या शब्दाबाहेर जात नसत.

मौर्याच्या काळामध्ये तर त्यांना ग्रामशासनाचा अधिकार होता. व त्या दृष्टीने या पंचायती खूपच विकसित झालेल्या होत्या. सन ८०० ते १०००च्या दरम्यान बोल घराण्याच्या इतिहासातील एकल येथील चौदा शिळा खऱ्या ग्रामपंचायतीच्या निर्देशक आहेत. आजच्या ग्रामपंचायती करीत असलेली विविध गाव विकासाची कामे या ग्रामपंचायती त्या वेळी करीत होत्या. ग्रामपंचायतीची निवडणूक दरसाल होत असे व सर्व सभासद लोकनियुक्त असत. त्यांच्यावर सरकारी अधिकाऱ्यांची देखरेखीसाठी नेमणूक होई. ग्रामपंचायतीकडे स्वतःच्या निधी असायचा. न्यायनिवाडे ही पंचायत करी, फाशीची शिक्षा क्वचितच अंमलात येई. देवळात नंदादीप लावणे अगर पंचायतीस अमुक इतक्या गाई पुरविणे या गोष्टी शिक्षा म्हणून देत असत.

भारतात अनेक साम्राज्ये आली होती. बाहेरून आलेल्या मोगलांनी ही पद्धत स्विकारली. भारतासारख्या खंडप्राय खेडयापाड्यात विखुरलेल्या देशाला विकेंद्रित शासनाचीच जरुरी होती. त्यामुळेच ही पद्धत अनेक वर्षे टिकून होती. त्यातूनच खेडी स्वयंपूर्ण बनत होती. ग्रामीण कारागीर, कष्टकरी यांना पोट भरण्याकरीता व्यवसाय मिळत होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात ग्रामपंचायतीची पद्धत चोहीकडे चालू होती. तीच रयतेच्या सोयीची वाटल्यावरून महाराजांनी कायम ठेवली. रयतेला न्याय मिळवण्यासाठी लांब कुठे जावे लागू नये, म्हणून गावातील पंचांनीच फुकट न्याय द्यावा, हे अभिप्रेत होते. छत्रपतीच्या काळात ग्रामपंचायती पूर्वीप्रमाणे चालू होत्या. ब्रिटीशांच्या आगमनानंतर त्यांनी मात्र आपापल्या स्वार्थासाठी गावगड्यांची चालू व्यवस्था मोडीत काढून तलाठी पोलीस पाटील यांच्यापासून ते कलेक्टर पर्यंत नोकरशाहीची फौज निर्माण केली. सन १८८२ साली लॉर्ड रिपनने मर्यादित स्वरुपात स्थानिक स्वराज संस्थेचा कार्यक्रम अंमलात आणला. परंतु आरोग्य आणि प्राथमिक सोयी सुविधा पुरतेच त्यांचे उद्दिष्ट मर्यादित होते. त्यामध्ये स्वराज्याचा मागमूसही नव्हता. याच काळात तालुका लोकल बोर्ड, जिल्हा लोकल बोर्ड व काही मोठया गावात ग्रामपंचायती स्थापन झाल्या. या स्थानिक स्वराज्य संस्था स्वातंत्र्य प्राप्ती नंतरही काही काळ चालू होत्या.

देशाच्या स्वातंत्र्य संग्रामाच्या काळात देशाच्या पुनुरुत्थापनाचा व नवनिर्माणाचा विचार सुरू झाला. त्यामध्ये गाव विकासाच्या दृष्टीने विचार होणे स्वाभाविक होते. महात्मा गांधींनी स्वातंत्र्य संग्रामाच्या काळात खेड्याकडे जाण्याचा मार्ग दाखविला आणि ग्राम स्वराज्याची कल्पना मांडली होती. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना नवा मुलभूत आणि व्यापक अर्थ मिळाला. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि घटना समितीची स्थापना झाली. स्वातंत्र्य लढ्यात लोकांनी उराशी बाळगलेल्या ध्येयात ग्राम स्वराज्य हे सूत्र होते. त्यामुळे देशाची घटना होत असताना ग्रामपंचायतीचा स्वतंत्र तिसरा सत्र असावा अशी सूचना मांडण्यात आली. त्या सूचनेला घटना समितीतील काही लोकांनी विरोध केला. भारतीय समाज व्यवस्था जाती व्यवस्थेच्या उतरंडीवरच आधारीत असल्यामुळे तथाकथित उच्च वर्गीय जातींना पंचायत व्यवस्थेत पंच म्हणून स्थान मिळत असे. तसेच गांवातील उच्च जातीय लोकच निर्णय घेण्यामध्ये महत्वाची भूमिका बजावत असत. अशा रितीने या पूर्ण व्यवस्थेमध्ये स्त्रिया आणि तथा कथित खालच्या जातींना कोणतेही स्थान नव्हते. ही व्यवस्था समानतेवर आधारीत नाही असे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे म्हणणे होते. त्यामुळे त्यांचा या व्यवस्थेला विरोध होता. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या तिसऱ्या स्थराची व्यवस्था अंमलात येण्यासाठी काही काळ थांबावे लागेल, कारण ग्रामपंचायतीचा वापर समाजातील हित संबंधी व श्रीमंत लोक करून घेतील व सर्व सामान्य लोकांवर व दलीतांवर अन्याय होईल, अशी भीती व्यक्त करण्यात आली. तरीसुद्धा घटना समितीने सामाजिक उद्दिष्ट म्हणून राज्ये, ग्रामपंचायत संघटीत करतील व त्यांना स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून काम करण्यास आवश्यक अधिकार देतील असे चाळीसाव्या मार्गदर्शक सूत्रात नमूद केले. बलवंतराय मेहता अभ्यास गटाने स्वातंत्र्य प्राप्तीनंतर पहिली पंचवार्षिक योजना अमलांत आणली. शेतकऱ्यांचा आणि खेड्यांतील इतर लोकांचा विकास करून त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी ही योजना सुरु करण्यात आली. लोकांचा सहभाग यामध्ये अपेक्षित होता पण या योजनेला म्हणावा तसा लोकसहभाग मिळाला नाही. या कामाची पाहणी करण्यासाठी नियोजन मंडळाने बलवंतराय मेहतांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यासगट नेमला. या अभ्यास गटाने आपला अहवाल सन १९५७ साली सदर केला. त्यामध्ये पंचायत राज्याची संकल्पना दिशा आणि रचनेच्या दूरगामी व अमुलाग्र बदलासाठी शिफारशी करण्यात आल्या आणि प्रथमच लोकशाही विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने पंचायत राज्याची संकल्पना मांडण्यात आली. राजस्थान सरकारने बलवंतराय समितीच्या सूचना विचारात घेऊन जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीची योजना आखली. दि.२ ऑक्टोबर १९५९ रोजी पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते या योजनेचे उद्घाटन केले आणि देशांत पंचायत राज सुरु झाले, अशी घोषणा केली. त्यानंतर ही व्यवस्था पंचायत राज या नावाने लोकप्रिय झाली. पंचायत राज व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर वेगवेगळ्या समित्या वेळोवेळी स्थापन करण्यात आल्या. त्यात श्री.व्ही. टी.कृष्णम्माचारी यांच्या अध्यक्षतेखाली १९६० साली समिती नेमण्यात आली. या अभ्यासगटाने काही महत्वाच्या शिफारशी केल्या. कायदयाने ग्रामसभा प्रस्थापित कराव्या व त्यांच्या किमान दोन सभा व्हाव्यात ही महत्वाची शिफारस या अभ्यास गटाने केली. सन १९७७ साली अशोक मेहता समिती स्थापन करण्यात आली. प्रत्येक राज्यातील पंचायत राज व्यवस्था त्या त्या राज्याच्या परिस्थितीप्रमाणे वेगवेगळी असू शकेल. आवश्यक वाटल्यास घटनेत दुरुस्ती करून पंचायत राज व्दारे लोकशाही विकेंद्रीकरण झाले पाहिजे असे मत या समितीने मांडले. सन १९८५ साली नियोजन मंडळाने ग्रामीण विकास व दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम परिणामकारक रितीने राबविला जावा म्हणून श्री.जी.व्ही.के.राव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीनेही लोकांचा प्रत्यक्ष सहभाग असावा म्हणून पंचायत राज व्यवस्थेला महात्वाचे स्थान असावे, अशी शिफारस केली. महाराष्ट्र शासनानेही पंचायत राज व्यवस्थेच्या यशस्वी परिणामकारकतेसाठी वेळोवेळी अभ्यासगट व समित्यांची स्थापना केली. एस.जी.बर्वे समिती १९६८, बोगिरवार समिती १९७०, मंत्रिमंडळाची उपसमिती १९८०, आणि पंचायत राज व्यवस्थेचे मुल्यमापन करण्यासाठी १९८४ साली प्राचार्य पी.बी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. या समितीने आपला अहवाल १९८६ साली सादर केला. ही सर्वात अलिकडील समिती असून त्यांच्या शिफारशीच्या आधारे राज्यशासन वेळोवेळी विचार करून दुरुस्त्या करीत आहे.

## एल.एम.सिंघवी समिती

सन १९८४च्या अखेरीस राजीव गांधी यांनी देशाच्या पंतप्रधान पदाची सूत्रे स्विकारली. त्यांच्या सरकारने पंचायत राज्य संस्थेला मजबूती प्रदान करण्याच्या उद्देशाने सन १९८६च्या जून महिन्यात एल.एम.सिंघवी यांच्या अध्यक्षतेखाली लोकशाही आणि विकास कामी पंचायतीचे पुर्नजीवन करण्यासाठी समिती नियुक्त केली. पंचायत राज संस्थांची सध्याची स्थिती त्यांची आत्तापर्यंतची वाटचाल आणि विकास कार्यातील त्यांची भूमिका इत्यादीचे मूल्यमापन करण्याची तसेच ग्रामीण विकास व राष्ट्रबांधणीच्या कार्यात पंचायत राज्य संस्थांना भरीव योगदान कसे करता येईल याबाबत उपाय सुचविण्याची जबाबदारी सिंघवी समितीवर सोपविण्यात आली होती. एल.एम.सिंघवी समितीच्या बऱ्याचशा शिफारशी यापुर्वीच्या काही समित्यांनी केलेल्या शिफारशी प्रमाणेच आहेत. तथापि सिंघवी समितीने एक अत्यंत महत्त्वपूर्ण शिफारस केली ती म्हणजे पंचायत राज संस्थांना किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक मान्यता व संरक्षण देण्यात यावे. त्याकरीता भारतीय राज्य घटनेत एक नवे प्रकरण समाविष्ट करण्यात यावे. सिंघवी समितीची ही शिफारस अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण मानावी लागेल. भारतात पंचायत राज्याची स्थापना झाल्यानंतर राजकिय नेत्यांनी व राज्यकर्त्यांनी ग्रामीण पुर्नरचनेच्या तसेच ग्रामीण विकासाच्या कार्यात पंचायत राज संस्था महत्त्वाची भूमिका बजावतील म्हणून त्यांना सक्षम बनविण्यासाठी विशेष प्रयत्न केले पाहिजेत, अशा अर्थाचे मत प्रदर्शन केले. ७३वी घटना दुरुस्ती करण्यामागे सिंघवी समितीच्या अहवालाचे फार मोठे योगदान आहे, असे म्हटल्यास त्यात वावगे काहीच नाही!

**!! पंचायत राज दिनानिमित्त सर्व भारतीय बांधवांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!**

**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी,**

# ओबीसी उमेदवारीने नगर दक्षीण मतदारसंघाचे चित्र पालटणार ?



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, अहमदनगर :** ओबीसी वंचित बहुजन पुरस्कृत उमेदवाराची घोषणा अहमदनगर दक्षिण मतदार संघातून होऊन उमेदवार दिलीप खेडकर यांच्या यंत्रणेकडून नगर दक्षीण मतदार संघात जोरदार ओबीसी मतदार संपर्क अभियान राबवले जात असून भाजपची हक्काची समजली जाणारी व्होट बँक म्हणजे ओबीसी (मा.ध.व) आता आपली वेगळी चूल मांडत असल्याने येत्या कालावधीत जिल्ह्याच्या प्रस्थापित राजकारणात मोठी उलथा पालथ होण्याची शक्यता राजकीय विश्लेषकांकडून वर्तवली जात आहे. लोकनेते गोपीनाथ मुंडे यांनी राज्यात ओबीसी अर्थात माधव फॉर्मुल्याचा वापर करत राज्यातील ओबीसी बहुल मतदारसंघात भाजपचा झेंडा उंचावत ठेवला होता.

लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या निधनानंतर ओबीसी नेतृत्वात विचलीतपणा येवून छगन भुजबळ यांनी ओबीसींचे नेतृत्व पुढे फुलवत ठेवले मात्र गेल्या काही वर्षांमध्ये मराठा समाजाने ओबीसी मधून आरक्षनाची मागणी केल्याने ओबीसी विरुद्ध मराठा असा संघर्ष पेटला त्यातच पंकजा मुंडे यांनी त्यावेळी झालेल्या ओबीसींच्या मेळाव्याकडे पाठ फिरवल्याने ओबीसी मध्ये अस्वस्थता पसरली ही पार्श्वभूमी असताना अहमदनगर दक्षिण मतदार संघातून यापूर्वीचे खासदार हे भाजपाचे सुजय विखे तसेच राष्ट्रवादी (शरद पवार), काँग्रेस तसेच शिवसेना (उद्धव ठाकरे) इंडिया आघाडीचे निलेश लंके हे दोन्ही उमेदवार मराठा असल्याने नगर दक्षीण मतदार संघात बहुसंख्य असलेल्या ओबीसी मतदारातून ओबीसी उमेदवार असावा अशी मागणी जोर धरत होती.

हीच बाब हेरून प्रकाश अण्णा शेंडगे व टीपी मुंडे यांनी ओबीसी बहुजन वंचित आघाडी पक्षाची स्थापना केली व अहमदनगर दक्षिण मतदार संघातून ओबीसी उमेदवाराची ऐनवेळी घोषणा केली. ओबीसी पक्षाकडून जिल्हाभर ओबीसी मतदार आपल्याकडे वळवण्यासाठी येत्या काळात ओबीसी नेत्यांच्या सभांचे नियोजन करण्यात आले असून तशा स्वरूपाचा तळागाळातील ओबीसी मतदार जनसंपर्क पक्ष नेतृत्व व उमेदवार दिलिप खेडकर यांच्याकडून केला जात आहे. त्यामुळे बहुतांश ओबीसी हा आपल्या पारंपारिक पक्षाला डावलून ओबीसी पक्षाला मतदान करणार का ? हे येता काळा ठरवणार आहे ? आणि जर ओबीसी मतदाराने आपल्या पारंपारिक पक्ष असलेल्या भाजपला डावलून मतदान केले तर यापूर्वीचा नगर दक्षिण मधला भाजपची व्होट बँक विखुरली जाऊन भाजपाचा गृहीत मताची आकडेवारी मोठ्या प्रमाणावर खालावली जावून नगर दक्षिण मतदारसंघाच्या राजकीय पटलावर वेगळे चित्र उमटणार आहे असे राजकीय विश्लेषकांकडून बोलले जात आहे.

# नांदिवली तलावात घाणीचे व कचऱ्याचे साम्राज्य !



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२३, कल्याण :** नांदिवली तलावात स्थानिकाकडून कचरा टाकला जात असल्यामुळे तलावातील पाणी गढूळ होऊन बिकट अवस्था झाली आहे. विशेष म्हणजे या तलावात स्थानिक नागरिक विविध धार्मिक विधीसह गणपती आणि देवीचे विसर्जन करतात. त्यावेळी तलावाची साफसफाई करण्यात येते. त्यांनतर मात्र वर्षभर या तलावात घाणीचे साम्राज्य पाहायला मिळत आहे. डोंबिवली शहरीकरणात अनेक तलाव हे नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. जे तलाव शिल्लक आहेत, त्यांचेही संवर्धन केले जात नाही. त्यामुळे बहुतांशी तलाव कोरडे पडले असून, अनेक तलाव शेवाळ, गाळ, कचरा यांनी भरले आहेत. महापालिकेने गणपती सणाच्या काळात काही तलावांचे सुशोभाकरण केले होते. त्यानंतर मात्र जलसंवर्धनाकडे पालिका प्रशासन आणि सत्ताधार्यांची उदासीनताच दिसून येत आहे. त्यामुळे कल्याणातील अनेक तलाव दुरावस्थेच्या गर्तेत सापडले आहेत. कल्याणमधील काळा तलाव आणि टिटवाळ्यातील महागणपती मंदिर तलावाचे पालिकेच्या वतीने सुशोभीकरण करण्यात आले आहे. या व्यतिरिक्त इतर तलावांना अवकळा आली आहे.जलसंवर्धनाकडे पालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असून त्यावर पालिका प्रशासनाकडून ठोस उपाययोजना केली जात नाही.

# विखेंच्या रॅलीत भाडोत्री गर्दी ; व्हिडिओ व्हायरल

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, अहमदनगर :** नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार सुजय विखे पाटील यांनी काल काढलेल्या रॅलीमध्ये मोठ्या प्रमाणात भाडोत्री गर्दी जमविण्यात आल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्याने नगरकरांनी संताप व्यक्त केला.

या रॅलीसाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह नेतेमंडळींच्या ताफ्यासह शेकडो भाडोत्री गाड्या आणण्यात आल्यामुळे शहरातील रस्ते अनेक तास बंद ठेवण्यात आले होते. शहरात प्रचंड वाहतूककोंडी झाल्यामुळे नागरिकांना भर उन्हात ताटकळत रहावे लागले. हि रॅली मध्यवस्तीतून गेल्यामुळे येथिल बँका,भाजी मार्केटसह दुकाने जबरदस्तीने बंद करण्यात आली होती. तसेच एसटी बसेस स्थानकामध्ये अडकून पडल्यामुळे आणि बाहेरच्या बस शहरात येऊ न दिल्याने प्रवाशांचे प्रचंड हाल झाले. एकंदरीत विखे यांचे अर्ज दाखल करण्यासाठीचे भाडोत्री शक्तिप्रदर्शन नगरकरांना मनस्ताप देणारे ठरले. दरम्यान, या रॅलीसाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दांडी मारल्याची चर्चा सुरू होती.

महायुतीचे उमेदवार सुजय विखे यांनी काल उमेदवारी अर्ज भरण्यासाठी रॅली काढून शक्तिप्रदर्शन करण्यात आले. या रॅलीत पदाधिकार्यांपेक्षा जमविण्यात आलेल्या भाडोत्री गर्दीची चर्चा मोठ्या प्रमाणात सुरू होती. गर्दी जमविण्यासाठी मोठ्या प्रमाणात गाड्यांची व्यवस्था करण्यात आली होती. रॅलीची सांगता होणारे ठिकाण मध्यवर्ती



असल्यामुळे तेथील राष्ट्रीय व सहकारी बँका बंद ठेवण्यात आल्या होत्या. तसेच गर्दीमुळे सर्वसामान्य नागरिकांना जाण्या - येण्यासाठी मार्गच नसल्यामुळे येथिल भाजी मार्केटही बंद ठेवण्यात आले होते.तसेच कार्यकर्त्यांनी तेथील व्यापाऱ्यांना दुकाने बंद करण्यास भाग पाडले. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना हालअपेष्टा सहन करावी लागली.

**भाडोत्रीचा व्हिडिओ व्हायरल**

विखे पाटील यांनी रॅलीत शक्तिप्रदर्शन करण्यासाठी जमविण्यात आलेल्या गर्दीतील नागरिकांना पैसे दिले नसल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्याने प्रचंड खळबळ उडाली.

विखे यांच्या रॅलीसाठी प्रचंड गर्दी जमविण्याचे आदेश महायुतीतील पदाधिकाऱ्यांना देण्यात आले होते. गेल्या चार दिवसांपासून यंत्रणा कामाला लागली होती.

या रॅलीसाठी जामगाव भागातून आलेल्या एका व्यक्तीने आम्हाला ५०० रुपये देतो, असे सांगितले होते, मात्र १०० रुपये सुद्धा दिले नाहीत, असा संताप व्यक्त केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

त्यामुळे विखेंच्या रॅलीत भाडोत्री गर्दी जमविल्याचा पर्दाफाश झाला आहे.

# ग्रामदैवत एकवीरा माता यात्रा उत्सव सुरू...



**अक्षराज : निवृत्ती शिंदे**

**दि.२३, नांदगाव (नाशिक) :** नांदगाव शहराचे ग्रामदैवत एकवीरा देवी यात्रेचा उत्सव २३ एप्रिल पासून प्रारंभ होत आहे. या मुहूर्तावर आमदार सुहास आण्णा कांदे यांना एकवीरा देवी मंदिर येथे जाऊन मनोभावे दर्शन घेत आरती चा लाभ घेतला. यावेळी शहरातील नागरीक, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाणी मिळेल का पाणी हंडाभर... पाणी

**अक्षराज : निवृत्ती शिंदे**

**दि.२३, नांदगांव (नाशिक) :** नगरपालिकेतील पाणीपुरवठ्याचा भोंगळ कारभारामुळे पाणी मिळेल का? पाणी अंडाभर पाणी म्हणण्याची वेळ आली आहे. तालुक्यातील द्वारका नगर भागात ३१दिवसापासुन पाणी पुरवठा नाही. नांदगाव नगरपालिकेच्या रोटेशन प्रमाणे पाणीपुरवठा होत नाही. धनधाडग्यांना पहिले पाणी दिले जाते व नांदगाव नगरपालिकेने बसवलेल्या टाक्या फक्त शोच्या वस्तू बनल्या असून पाणीपुरवठा केला जात नाही. द्वारका नगर या भागामध्ये सर्व आदिवासी वस्ती असून यांना हंडाभर पाण्यासाठी पायपीट करावे लागत आहे. काही नागरिकांना पाण्यासाठी गाव सोडण्याची वेळ आली आहे नगरपालिका प्रशासन कधी जागे होईल अशी नांदगाव शहरातील जनतेचा आक्रोश व भावना आहे.

# मतदार जागृतीनिमित्त सायकल रॅली, पोस्टर्स स्पर्धेचे यशस्वी आयोजन

**अक्षराज : संगिता वनकळस**

**दि.२३, कळंब (धाराशिव) :** धाराशिव लोकसभा मतदारसंघासाठी येत्या ७ मे रोजी मतदान होणार आहे. जास्तीत जास्त मतदान व्हावे. त्या अनुषंगाने मतदार जनजागृती कक्षाच्या वतीने मतदार जनजागृती सायकल रॅली आणि मतदार जनजागृतीवर आधारीत पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन मंगळवार, दिनांक २३ एप्रिल रोजी करण्यात आले होते. सायकल रॅलीला जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांनी हिरवा झेंडा दाखवून सुरुवात केली.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनक घोष, अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षक गौहर हसन, जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी सुधा साळुंखे, मतदार जनजागृती कक्षातील शिक्षण विस्तार अधिकारी, विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी पोस्टर प्रदर्शनाचे फीत कापून उद्घाटन केले.यानिमित्ताने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणातून शाळकरी विद्यार्थ्यांची सायकल रॅली काढण्यात आली. ही सायकल रॅली शहरातील सर्व प्रमुख मार्गावरून जाऊन मतदारांपर्यंत मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले. जिल्ह्यातील कला शिक्षकांच्या माध्यमातून निवडणूक जनजागृतीपर पोस्टर रेखाटनाचे आयोजन करण्यात आले होते.


पोस्टर प्रदर्शन सायकल फेरीच्या ठिकाणी लावण्यात आले होते.पोस्टर प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले.सायकल रॅलीला हिरवा झेंडा दाखवून जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः या रॅलीत सहभागी होऊन जनजागृतीसाठी सायकल स्वारी केली.



मतदार जनजागृतीसाठी जिल्ह्यात सर्वस्तरावर प्रयत्न केले जात असून याचाच एक भाग म्हणून या सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. मतदारांनी कोणत्याही आमिषाला बळी न पडता लोकशाहीच्या महोत्सवात निर्भीडपणे मतदान करण्यासाठी पुढे यावे असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांनी यानिमित्ताने जिल्ह्यातील मतदारांना केले.

मतदार जनजागृती कक्षाच्या प्रमुख शिक्षणाधिकारी(मा) सुधा साळुंखे यांनी जिल्ह्यातील मतदारांना जागृत करण्यासाठी प्रत्येक शाळांमधून विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांना लिहिलेलं भावनिक पत्र तसेच विद्यार्थ्यांची मानवी साखळी, विद्यार्थ्यांची सायकल रॅली,पथनाट्य, पोस्टर प्रदर्शन यासारख्या उपक्रमातून जनजागृती केली जात आहे. त्यामुळे जिल्ह्यातील मतदारांनी जास्तीत जास्त मतदान करून लोकशाहीसाठी आपलं कर्तव्य बजावावे.असे आवाहन त्यांनी केले.

# लोकसभेचे निवडणुकीपूर्वी नागरिकांमध्ये रंगली चांगलीच चर्चा




**अक्षराज : प्रमोद मौळे**

**दि.२३, जव्हार (पालघर) :** पालघर जिल्यातील आदिवासी बहुल भागाचा विकास व्हावा यासाठी गेल्या अनेक वर्षापासून डहाणू जव्हार मोखाडा नाशिक या रेल्वे मार्गाची मागणी सातत्याने करण्यात आली आहे. परंतु या प्रश्नाकडे सत्ताधाऱ्यांचे दुर्लक्ष झालेले आहे. लोकसभेची निवडणूक आली की या रेल्वे मार्गाची चर्चा सुरू होते. रेल्वेचा प्रश्न मार्गी लागेल याबाबत राजकारणाकडून सांगितले जाते. परंतु निवडणुकांनंतर मात्र परिस्थिती जैसे थे राहते.यामुळे वर्षानुवर्ष रेल्वेचा प्रश्न खितपत पडला आहे. त्यामुळे आता पालघर जिल्यातील नागरिकांमध्ये सध्या लोकसभेचे निवडणुकीत चांगलीच चर्चा रंगली आहे.

मागील २ सर्वे मध्ये रेल्वे मार्ग तोट्यात असल्याचे निरीक्षणात नोंदविले होते, त्यानंतर खासदार गावित यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची २६ जून २०२३ रोजी दिल्ली रेल भवन येथे भेट घेवून डहाणू - कासा - जव्हार - मोखाडा - नाशिक या रेल्वे मार्गासाठी निवेदन देवून आग्रही मागणी केली होती असे खासदार यांनी माहिती दिली होती परंतु आतापर्यंत या मार्गासाठी सकारात्मक प्रतिसाद दिसत नसल्याचे पालघर जिल्यातील नागरिकांकडून सांगण्यात येत आहे.परंतु सध्या कोणता उमेदवार हा प्रश्न मार्गी लावेल हा प्रश्न नागरिकांना पडलेला आहे. तसेच कोणत्या उमेदवाराला मतदान करायचं असा देखील नागरिकांसमोर प्रश्न चिन्ह निर्माण झाला आहे.

**जव्हार मिनी महाबळेश्वर म्हणून पर्यटन दर्जा देऊन फायदा काय..?**

हा रेल्वेमार्ग झाला तर येथील भागात रोजगार उपलब्धता होवून एक चांगली सुविधा निर्माण होईल तसेच कुपोषण थांबवण्यासाठी भारत सरकार या योजनेतून व महाराष्ट्र शासन या योजनेतून रोजगार उपलब्धता होईल व रोजगार मिळून हा रेल्वेमार्ग आदिवासी भागासाठी वरदान ठरू शकेल असे पालघर जिल्यातील नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे.

# पत्रलेखनासारख्या अभिनव उपक्रमातून विद्यार्थ्यांनी पालकांना केले मतदानाचे आवाहन

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२३, नवी मुंबई :** संविधानाने दिलेला मतदानाचा अधिकार प्रत्येक नागरिकाने २० मे रोजी होत असलेल्या ठाणे लोकसभा निवडणूकीत हक्काने बजावावा याकरिता विविध माध्यमांतून जनजागृती करण्यात येत असून मतदानविषयक प्रचार, प्रसाराच्या स्वीप कार्यक्रमांतर्गत १५० ऐरोली व १५१ बेलापूर विधानसभा मतदारसंघ कार्यालयाच्या वतीने वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येत आहेत.

लोकसभा निवडणूकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी विविध माध्यमांतून प्रयत्न करण्यात येत असून मुलांनी मागणी केलेल्या एखाद्या गोष्टीला पालकांकडून उत्तम प्रतिसाद मिळतो हे लक्षात घेत पत्रलेखन हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. याद्वारे विद्यार्थ्यांनी आपले आई-बाबा यांना पत्र लिहून त्यांनी येत्या लोकसभा निवडणूकीत संविधानाने दिलेला मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन केले. नवी मुंबई महानगरपालिका शाळांप्रमाणेच खाजगी शाळांतून हा उपक्रम उत्साहाने राबविण्यात आला. अनेक शाळांनी त्याकरिता आपल्या विद्यार्थ्यांना पोस्टकार्ड, अंतर्देशीय पत्र उपलब्ध करून दिली होती.

‘माझ्या उज्ज्वल भविष्यासाठी, लोकशाही बळकट करण्यासाठी



नक्की मतदान करा’ असा आईबाबांना आग्रह करणारे हे पत्रलेखन मुलांकडून आपल्या पालकांना त्यांच्या मतदानाच्या अधिकाराची जाणीव करून देणारे होते. या पत्रलेखनातून मुलांमार्फत मतदार पालकांना आवाहन तर करण्यात आलेच शिवाय सध्याच्या समाज माध्यमांतून संदेश आदान प्रदानाच्या तंत्रस्नेही युगात पत्रलेखना सारख्या दुर्मिळ होत चाललेल्या माध्यमाचा आनंदही याद्वारे विद्यार्थ्यांना घेता आला. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अतिशय आनंदाने पालकांनी मतदान करावे असे आवाहन पत्र लिहिले व पालकांनीही या पत्रलेखन उपक्रमाचे भरभरून कौतुक केले.

महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिकेच्या शाळांसह खाजगी शाळांमध्येही शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखाली या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.